# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री.अनिल नारायण पाटील

### मु. सांगे, पो. गो-हे, ता.वाडा, जि.ठाणे



- उताराविरील वरकस व पडीक जमिनीवर कंटूर पध्दतीने चर खोदून जलसंधारणासाठी योगदान.
- घनदाट पध्दतीने आंबा- केशर पिकाची यशस्वी लागवड व परिसरातील शेतक-यांसाठी मार्गदर्शक.
- टिश्युकल्चरची केळी लागवड व तैवान पपईच्या लागवडीद्वारे व्यापारी पध्दतीने शेती.
- २००८ मध्ये कृषि विभागातर्फे शेती माहीतीसाठी चीन येथील परदेश दौरा.
- ठाणे जि.प. चे प्रगतशील व शेतीनिष्ठ शेतकरी, मराठवाडा सेवा संघाचा समाजभूषण शेतकरी पुरस्कार.

२

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. मधुसूदन  केशव गावडे

### मु. पो. वेतोरे, पालकरवाडी, ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग



- वेंगुर्लासारख्या दुर्गम भागात एम.के. स्वयंरोजगार सहकारी संस्थेची स्थापना.
- वेंगुर्ला येथील घरकाम करणा-या १०७ व देवगड येथील ६९ महिलांना प्रक्रिया  उद्योग करण्यासाठी उद्युक्त केले.
- महाराष्ट्रातील पहिली महिला काथ्या कारागीर सहकारी संस्थेची स्थापना व त्यामधुन काथ्या, मॅटींग, पायपुसणी, दो-या व गाद्या या सारख्या उत्पादनांची निर्मिती.
- सुर्यकांत महिला सहकारी संस्था वेंगुर्ला  या प्रक्रिया युनिटची स्थापना, त्यामधील प्रक्रिया उत्पादीत मालाची “ स्वाद महाराष्ट्राचा ” या नावाने बिगबाजारमध्ये विक्री.

३

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. बाळासाहेब शंकर मराळे

### मु.पो. शहा, ता.सिन्नर, जि. नाशिक



- राज्यातील शेतक-यांना कोरडवाहू शेतीसाठी शेवग्यासारखा नविन पिक पर्याय देऊन स्वत: 'रोहीत-१' हे शेवगा वाण विकसीत.
- शेवगा लागवड पध्दत, छाटणी तंत्र, खत व्यवस्थापन, पिक तोडणी तंत्र, पॅकींग विक्री व निर्यात याद्वारे "मराळे शेवगा पॅटर्न" विकसीत.
- शेवगा पानापासून पावडर व बियांपासून तेल (बेन ऑईल) यासारख्या प्रक्रिया उत्पादनाची निर्मिती तसेच शेवगा उत्पादीत करणा-या २५ शेतक-यांचा गट स्थापन करुन शेवगा शेंगाची लंडनला निर्यात.
- विविध पुरस्कारांनी सन्मानित.

४

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. सुदाम किसन करंके

### मु.पो. त-हाडी, ता. शिरपूर, जि. धुळे



- २ एकर क्षेत्रामध्ये १ वर्षात पपई पिकाद्वारे ४.०० लाख रुपयाचे उत्पादन.
- शेतीवरील खर्च कमी करुन व्यापारी पध्दतीने नफा मिळविण्यासाठी सेंद्रीय पध्दतीने शेती.
- केळीपासून वेफर्ससारख्या प्रक्रिया पदार्थांची निर्मिती व व्यवसाय.
- ॲग्रोवन दैनिकातील लेखाद्वारे व आकाशवाणी वरील मुलाखतीद्वारे शेतक-यांना मार्गदर्शन.
- कृषक समाजाच्या कृषिरत्न डॉ.पंजाबराव स्मृती पुरस्काराने सन्मानित.

५

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. हिरालाल छन्नु पाटील

### मु.पो. कुरवेल, ता. चोपडा, जि. जळगाव



- अत्याधुनिक शेतीला पारंपारिक शेतीची जोड देऊन शेती फायद्यात आणणारे व अंतर मशागतीसाठी कमी जास्त अंतर करता येणारे कोळपे विकसित करणारे शेतकरी.
- माहिती तंत्रज्ञानाचा वापर करुन भविष्याच्या शेतीकडे वाटचाल करणारे आधुनिक शेतकरी.
- कच्च्या केळापासून वेफर्स, लाल मिरची पावडर तयार करणे, हरभ-यापासून फुटाणे व डाळ तयार करणे ई. शेती पूरक गृहोद्योगाव्दारे रोजगार निर्मिती.
- समाजकार्यात सक्रिय तसेच गावातील व्यसनमुक्ती सारख्या कार्यात सक्रिय सहभाग व सातत्याने प्रयत्न.
- आदर्श शेतकरी पुरस्काराने सन्मानित.

६

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. अरुण गोविंद मोरे

### मु.पो. शिरोली खुर्द, ता. जुन्नर, जि. पुणे



७

- स्वत:कडील पडीक क्षेत्रावर जलसंधारणाची कामे करुन क्षेत्र ओलीताखाली आणले व श्रमदानातून वनराई बंधारा उभारणी.
- परिसरातील ३०० शेतक-यांचे महाराष्ट्र जलक्षेत्र सुधार प्रकल्पांतर्गत संघटन करुन कृषि विज्ञान मंडळाची स्थापना.
- पीकनिहाय शेतक-यांच्या गटाची स्थापना करुन विविध पिक प्रकल्पांची गटनिहाय अंमलबजावणी.
- आर्थिक परिस्थितीवर मात करुन राहणीमान उंचविण्यासाठी १५ पुरुष व २९ महिला बचतगटाची स्थापना.
- आधुनिक तंत्रज्ञान वापराद्वारे १६ शेडनेटच्या उभारणीतुन भाजीपाला व इतर कमी खर्चाच्या पिकांचे उत्पादन.
- आदर्श सरपंच तसेच तालुका जिल्हा पातळीवर कृषि विषयक पुरस्कारांनी सन्मानित.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. मच्छिंद्र भागवत घोलप

### मु.पो. हनुमंतगाव, ता. राहता, जि. अहमदनगर



- केमिकल इंजिनिअरींग पदवीधारक असूनही आधुनिक शेती व्यवसायाकडे कल.
- जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी व उच्च प्रतिच्या कृषिमाल उत्पादनासाठी सेंद्रीय पध्दतीने शेती.
- पाणी व्यवस्थापन, हिरवळीच्या खतांचा वापर, उस खोडवा आच्छादन व मिश्र पिक पध्दतीद्वारे उत्पादनात मोठ्या प्रमाणात वाढ.
- पाणी व्यवस्थापन, एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन, पिक पध्दतीत बदल केल्यास जमिनीची सुपिकता टिकून शेती फायद्याची होते ही बाब शेतक-यामध्ये रुजविण्याचे प्रयत्न.
- सह्याद्री कृषि सन्मान, आदर्श शेतकरी पुरस्कार, कृषि गौरव पुरस्कार, प्रगतशिल शेतकरी पुरस्कार, साईरत्न पुरस्कार, आदर्श शेतकरी मित्र, व्यवस्थापन पुरस्कार या सारख्या विविध पुरस्कारांनी सन्मानित..

८

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. विष्णू रामचंद्र जरे

### मु.बहिरवाडी, पो. जेऊर, ता. जि. अहमदनगर



- पाणलोट व्यवस्थापनाच्या कामाव्दारे शेतीचे व्यवस्थापन करुन विहीरीतील पाण्याच्या पातळीत वाढ.
- लसूण पिकाच्या नविन जातीच्या बिजोत्पादन कार्यक्रमात सहभाग.
- ठिबक सिंचनाव्दारे पाणी व्यवस्थापनाकडे भर व काटकसरीने पाणी वापर करुन उत्पादनात वाढ.
- सेंद्रीय शेती, गांडूळ खत व बायोडायनामिक कंपोस्ट वापराव्दारे शेती व महिला गटाच्या स्थापनेव्दारे स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्रयत्न तसेच दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन यासारखे शेती पूरक व्यवसाय.
- सारायंत्र, पेरणी यंत्र, फवारणी पंप, दुचाडी पाभर सारख्या यंत्राच्या वापराव्दारे शेत मजुरांच्या समस्यावर मात.

९

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. हंबीरराव जगन्नाथ भोसले

### मु.पो. खोडशी, ता. कराड, जि. सातारा



- उपलब्ध क्षेत्रावर आधुनिक पध्दत, नवीन तंत्रज्ञान व सेंद्रिय शेतीव्दारे उत्पादन घेऊन रसायनमुक्त कृषि उत्पादनाकडे कल.
- शेतातील काडीकचरा व पिकांचे अवशेष याव्दारे स्वतः साठी ५० ते ६० टन कम्पोस्ट खताची निर्मिती.
- सेंद्रिय शेतीबाबत परिसरात जागृती करुन कृषि विभागाच्या मदतीने ११ गांडूळखत निर्मिती प्रकल्पामध्ये सहभाग.
- चारसूत्री पिक पध्दतीचा भात पिकामध्ये वापर करुन उत्पादनात तालुका व जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक.
- दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन सारखे जोडधंदे करुन शेतीला पूरक उत्पनाची जोड.

१०

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. सुर्याजी गणपत पाटील

### मु.पो. परिते, ता. करवीर, जि. कोल्हापूर



- सर्व पडीक क्षेत्र जलसंधारणाच्या विविध उपचारांद्वारे शेतीखाली आणून शेतीचा विकास.
- महालक्ष्मी कृषि विज्ञान मंडळाची स्थापना करुन त्याद्वारे व कृषि महाविद्यालय, कोल्हापूरच्या सहकार्याने शिबीर, शिवारफेरीद्वारे शेतक-यांना मार्गदर्शन.
- शेतक-यांना आधुनिक शेतीचे मार्गदर्शन करणेकरीता शैक्षणिक सहल, अभ्यासदौरे, प्रशिक्षण व स्वयंरोजगार कार्यशाळांचे आयोजन.
- "जमिन वाचवा" अभियानाचा परिसरात प्रसार व त्याबाबत शेतक-यांना मार्गदर्शन.
- कुक्कुटपालन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसायासारख्या शेतीपूरक व्यवसायाद्वारे आर्थिक उन्नती साधण्यासाठी व रोजगार निर्मितीकरीता प्रयत्नवादी.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. जगन्नाथ गंगाराम तायडे

### मु.पो. औरंगपूर, ता. जि. औरंगाबाद



१२

- सूर्यफुलासारख्या नगदी पिकाचा उत्तम व्यवस्थापनाद्वारे व बिजोत्पादनाद्वारे विकास.
- यांत्रिकीकरणाद्वारे शेतीचा विकास व आर्थिक वृध्दी.
- जमिनीची सुपिकता टिकविण्यासाठी सेंद्रिय पध्दतीने शेती व त्यासाठी कम्पोस्ट, गांडूळ व हिरवळीच्या खतांचा वापर.
- स्वतःच्या कल्पकतेतून शेडनेटच्या डिझाईनमध्ये बदल करुन २५ % खर्चात बचत व नफ्यात वाढ.
- शेती तंत्रज्ञानाच्या विकासाच्या ध्यासापोटी परदेश दौ-यामध्ये (इस्त्राईल) सहभाग.
- शेतीनिष्ठ पुरस्कार व संशोधक शेतकरी पुरस्कारांनी सन्मानित.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री.सुर्यकांतराव माणिकराव देशमुख

### मु.पो. झरी, ता. जि. परभणी



१३

- जमिन सपाटीकरणाद्वारे संपुर्ण क्षेत्राचा पिकाखाली उपयोग.
- मोठ्या प्रमाणात मोसंबी, लिंबू व जांभुळ फळपिकाची लागवड.
- संनियंत्रित खत वापरासाठी माती परिक्षणानंतर गरजेनुसार खत वापर.
- पाणी अडवा पाणी जिरवा मोहिमेंतर्गत गावातील ओढ्यावर बांध बंधीस्तीने पाण्याच्या पातळीमध्ये वाढ.
- परिसरातील शेतक-यांचे सेंद्रिय शेती मार्गदर्शक.
- महिला बचत गटाच्या स्थापनेद्वारे रोजगार निर्मितीसाठी प्रयत्न.
- शेतीनिष्ठ शेतकरी पुरस्काराने सन्मानित.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री.रविंद्र रामकृष्ण मुळे

### मु. खानजमानगर, पो. हरम, ता. अचलपूर, जि. अमरावती



- बहुपिक सेंद्रिय शेती पध्दतीचा अवलंब करुन जिल्हा सरासरी उत्पादकतेपेक्षा जास्त उत्पादन.
- एकात्मिक कीड व्यवस्थापन व मधुमक्षिका पालनाद्वारे उत्पादनात वाढ.
- जैविक खताच्या वापराद्वारे प्रत्येक वेळी १५-२० टक्के उत्पादनात वाढ.
- उष्ण व शीत लहरीपासून पिक संरक्षणासाठी बांधावर सागाची लागवड.
- संत्र्यावरील डिंक्या रोग व खोड पोखरणा-या अळीबाबत टिव्ही मुलाखतीद्वारे परिसरातील शेतक-यांना मार्गदर्शन.
- किसान मंडळाची स्थापना व त्याद्वारे विविध उपक्रमांची अंमलबजावणी.

१४

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. सुधाकर रामचंद्र बानाईत

### मु.पो. मधापूरी, ता. मुर्तिजापूर, जि.अकोला



१५

- जलसंधारणाचा अभ्यास करुन पडीक जमिनीचा विकास व ओलीताखालील क्षेत्रात वाढ.
- शेतीतील विहिरींचे पावसाच्या पाण्याद्वारे पुनर्भरण.
- पीक संरक्षणासाठी एकात्मिक पिक संरक्षणाचा १०० % वापर.
- निवड पध्दतीने स्वतःच्या “शुभा” या काकडी वाणाचा विकास व बिजोत्पादन कार्यक्रमाद्वारे विकास.
- जलसाक्षरता भूषण, जलपुरस्कार, उद्यान रत्न व उत्तम शेतकरी पुरस्कारांनी सन्मानित.

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. रामभाऊ इसनजी कडव

### मु.इंदूरखा, पो. कोथूर्णा, ता. जि.भंडारा



- बी.कॉम व एलएलबी पदवीधारक असूनही शेती व्यवसायाची निवड करुन स्वतःच्या मुलांना मधुमाक्षिका पालनाचे प्रशिक्षण घेण्यास पाठविले.
- सेंद्रिय शेतीचा ध्यास, सन २००५ पासून रा. खतांचा वापर कमी केला.
- हळद पिकाची शेती करणा-या शेतक-यांचा गट स्थापन करुन त्याचा पूरक व्यवसाय करण्यासाठी शेतक-यांना उद्युक्त केले.
- दुग्धव्यवसाय व दालमिलसारख्या पूरक व्यवसायाव्दारे आर्थिक उन्नती.
- २० शेतक-यांच्या नगदी पिकांच्या स्वयंसहाय्यता बचतगटाची स्थापना करुन त्याव्दारे कृषि मालाचे विपणन.
- सन २०१२-१३ साठी तालुक्यात पिक स्पर्धेत प्रथम क्रमांक व शेती मित्र पुरस्काराने सन्मानित.

१६

# वसंतराव नाईक कृषिभूषण २०१२

## श्री. देवाजी मारोती बनकर

## मु.पो.ता. सडकअर्जुनी, जि. गोंदिया



- शेतीच्या विकासासाठी शेती लगतच्या नाल्यावर वनराई बंधारा बांधून शेतीतील विहीरीच्या पाणी पातळीत वाढ केली.
- फळरोपवाटीकेची निर्मिती व त्याव्दारे उत्पादीत कलमे/ रोपे परिसरातील शेतक-यांना अल्प दरात उपलब्ध करुन दिली.
- परिसरातील शेतक-यांना संघटीत करुन कोल्हापूर पध्दतीचे बंधारे बांधुन ओलीत क्षेत्रात वाढ.
- चांगल्या प्रतीच्या गुळ प्रक्रीयेचे तंत्रज्ञान आत्मसात करुन फुले नगरचा गुळ म्हणून त्यास प्रसिध्दी व बाजारात उत्तम दर मिळण्यासाठी प्रयत्नवादी.
- गुळ निर्मितीव्दारे परिसरातील शेतक-यांसाठी व युवकांसाठी रोजगार निर्मिती व पर्यावरण संवर्धक व त्या अनुषंगाने शेतक-यांचे मार्गदर्शक.
- या कार्यामुळे महाराष्ट्र राज्य प्रदूषण मंडळाच्या सदस्य पदावर नियुक्ती.
- लोकमत त्रिदशकपूर्ती सन्मान, शेतीनिष्ठ पुरस्कार व उद्यान पंडीत या सारख्या पुरस्कारांनी सन्मानित.

१७